# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

शासकीय तंत्रनिकेतन परिसर,पोस्ट बॉक्स नं-२१९,
सामनगांवरोड,नाशिकरोड,नाशिक-४२२ १०१
☎ (०२५३) २४६१४७९, फॅक्स-२४५५३०१
e-mail : ronashik.dte@gmail.com web : www.dtensk.org


**संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी**

जा.क्र.तंशि/विकाना/माअ-आस्था/२०११/१२९
दिनांक:-२५ जानेवारी,२०११.

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय,व विनाअनुदानित
तंत्रनिकेतने, नाशिक विभाग.

**विषय:**-माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती पुरविणेबाबत.
महाराष्ट्रातील सर्व शासकीय व खाजगी तंत्रनिकेतनातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांची माहिती पुरविणेबाबत.

**संदर्भ**-तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांचे या विभागीय कार्यालयास उद्देशून असलेले पत्र क्रमांक १०/एनजीपी/२०१०/२४२२,दि.३१.१२.२०१० व त्यासोबतचा श्री.बलदेव आडे,अध्यक्ष विमुक्त भटके शिक्षक सभा,म.राज्य,नागपूर यांचा दि.१.१२.२०१० रोजीचा माहितीचा अधिकारांतर्गत मा. माहिती अधिकारी,मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांना उद्देशून असलेला अर्ज.

उपरोक्त विषयास अनुसरुन तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांचे या विभागीय कार्यालयास उद्देशून असलेले वरील संदर्भिय पत्र व त्यासोबतचा श्री.बलदेव आडे,अध्यक्ष विमुक्त भटके शिक्षक सभा,म.राज्य,नागपूर यांचा दि.१.१२.२०१० रोजीचा माहितीचा अधिकारांतर्गत मा.माहिती अधिकारी,मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म. राज्य,मुंबई यांना उद्देशून असलेल्या विहित नमुन्यातील अर्जाची छायांकित प्रत या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सोबत अर्जदाराच्या दि.१.१२.२०१० रोजीच्या अर्जाची छायांकित प्रत जोडली आहे.

अर्जदार श्री.बलदेव आडे यांनी संचालनालयाकडे महाराष्ट्रातील सर्व शासकीय व खाजगी तंत्रनिकेतनातील सध्या कार्यरत सर्व विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सर्व शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचारी यांची पुर्ण नांवे, पुर्ण पत्ते,फोन नंबर्स,जात,जमात व प्रवर्ग याबाबत तपशिलवार माहिती माहितीचा अधिकारांतर्गत विहित नमुन्यातील अर्जान्वये माहिती मागीतलेली आहे. अर्जदाराने मागीतलेली माहिती अर्जदारास या विभागीय कार्यालयामार्फत पुरविण्याबाबत संचालनालयाचे या कार्यालयास निर्देश आहेत.

तरी त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, अर्जदाराने त्यांचे अर्जात नमूद आपल्या संस्थेत सध्या कार्यरत सर्व विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सर्व शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचारी यांची पुर्ण नांवे, पुर्ण पत्ते,फोन नंबर्स,जात,जमात व प्रवर्ग याबाबत तपशिलवार माहिती श्री.बलदेव आडे यांना आपल्या स्तरावरुन परस्पर पाठविण्यात यावी व त्याची प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

**( दि.रा.नंदनवार )**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,नाशिक.

सहपत्र-वरीलप्रमाणे.
प्रत-
१)श्री.बलदेव आडे,अध्यक्ष विमुक्त भटके शिक्षक सभा,म.राज्य,ई-५०२,एन.आय.टी. कॉम्प्लेक्स, गुरुदेवनगर, नागपूर-४४०००९ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

२)श्रीमती.ए.सी.अत्तार,माहिती अधिकारी,तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांना माहितीसाठी.

## जोडपत्र - अ

( नियम ३ नुसार )

(महाराष्ट्र) माहितीचा अधिकार कायदा - २००५ कलम अन्वये अर्ज

(माहिती) अधिकारी, मा. माहिती अधिकारी,

(कार्या)लयाचे नाव व पत्ता) :- मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालय,

3, महापालिका मार्ग, पो.बॉक्स न. 1967, मुंबई-400001 यांचे कार्यालय.

अर्जदाराचे संपुर्ण नाव :- बलदेव आडे, अध्यक्ष, विमुक्त भटके शिक्षक सभा (म.रा.)

पत्र व्यवहारासाठी पुर्ण पत्ता :- ई/502, एन आयटी कॉम्प्लेक्स,

गुरुदेवनगर, नागपूर-440009

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :- महाराष्ट्रातील सर्व शासकीय व खाजगी तंत्र (Polytechnic) महाविद्यालयांतील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची पूर्ण नावे, पूर्ण पत्ते, फोन नंबर्स, जात/जमात व प्रवर्ग याबाबत तपशिलवार माहिती मिळणेबाबत.

I) माहितीचा विषय :- महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय व खाजगी तंत्र (Poly) महाविद्यालयांतील सध्या कार्यरत सर्व विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांची नावे, पत्ते, फोन नंबर्स, जात व प्रवर्ग यांची

II) माहितीशी संबंधित कालावधी :- (सध्या कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी) माहिती मिळणेबाबत.

III) आवश्यक असलेल्या दस्ताऐवजाचे वर्गीकरण :- ———

(कलम ४ खाली प्रसिध्द केली असल्यास) ———

IV) टपालाने हवी की व्यक्तिशः :- साध्या पोष्टाने

(साध्या पोष्टाने, रजिष्टर पोष्टाने किंवा स्पीड पोष्टाने)

V) माहिती कशासाठी हवी :- सर्व शासकीय व खाजगी Poly महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना अनुशेष तपासण्यासाठी व शासनाकडे अपूर्ण जागा (अनुशेष) भरण्यासाठीची मागणी करण्यासाठी.

अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नागरीक असल्यास: ———

(त्यासंबधच्या पुराव्याची झेरॉक्स प्रत जोडावी) ———

तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई 35493 ... 10

दिनांक :- 1-12-2010

ठिकाण :- नागपूर

फि विषयक :- सोबत रुपये१०/- दिले

रोखीने अथवा बँकर्स चेकने अथवा कार्यालय क्र. ...99...

डिमांड ड्राफ्टने अथवा कोर्ट फि स्टॅम्प

(स्वाक्षरी)

अर्जदाराची स्वाक्षरी

बलदेव आडे
अध्यक्ष
विमुक्त भटके शिक्षक सभा (म.रा.)
ई-502, एन.आय.टी. कॉम्प्लेक्स,
गुरुदेवनगर, नागपूर-440009
मो.: 9890914480

1- उपरोक्त विषयातील माहिती आपल्या कार्यालयात संग्रहित नसल्यास सर्व संस्थांना निर्देश देऊन माहिती परस्पर देण्यात यावी.